महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव विभाग, जळगांव**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय इमारत (पहिला मजला),**
**ग्राहक न्यायालयाच्या मागे, जळगांव-४२५ ००१**

**दुरध्वनी क्र. २२३८५१०** **फॅक्स क्र. ०२५७/ २२३८५१०**

जा.क्र.अनु-१ अ/कार्यभार/२०१२-१३/ २२९३ दिनांक १६/९/२०१३

प्रति,

प्राचार्य,
पी.आर.हायस्कूल सोसायटीचे,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
धरणगांव. जि.जळगांव

विषय :- **दिनांक १.१०.२०१२ च्या विद्यार्थी संख्येच्या आधारावर पदनिश्चिती**
संदर्भ :- आपले पत्र क्र.कवाविमध/२०१२-१३/४६९, दिनांक २९.१०.२०१२

वरील विषयाच्या संदर्भात आपण पाठविलेला आपल्या महाविद्यालयाचा दिनांक १.१०.२०१२ च्या विद्यार्थी संख्येच्या आधारावर विषयनिहाय, विद्याशाखानिहाय कार्यभार तपासण्यात आला. शासननिर्णय क्रमांक एनजीसी/१२९८/ (४६१९)/युनि-४, दिनांक १२.८.२००९ च्या विहित केलेल्या कार्यभाराच्या मानकानुसार आपण पाठविलेल्या कार्यभाराची छाननी केली असून खालील अटींच्या अधिन राहून आपल्या महाविद्यालयातील शिक्षक कर्मचा-यांची पदनिश्चिती करण्यात येत आहेत. सदरचा कार्यभार तपासतांना शासन निर्णय दिनांक १.६.१९८१ मधील तरतुदींनुसार सूट देण्यात आली आहे.

**अटी :-**

१. आपल्या महाविद्यालयातील आपण दाखविलेली वर्षनिहाय विद्यार्थीसंख्या ही पटावर असणे आवश्यक आहे.
२. व्याख्याने/प्रात्यक्षिके/टयुटोरिअल/प्रोजेक्ट यासाठी दाखविलेल्या तासिका विद्यापीठाने विहित केलेल्या व वेळोवेळी त्यात बदल केलेल्या नियमानुसार असणे आवश्यक आहे.
३. विषयनिहाय दाखविलेल्या विविध तासिका प्रत्यक्षात वेळापत्रकात असणे आवश्यक आहे.
४. ही मान्यता पदांना वेतन अनुदान निर्धारणा संदर्भात आहे. त्या पदावरील नेमणूका अस्तित्वात असलेल्या विद्यापीठाच्या व शासनाच्या सर्व संबंधित नियमानुसार असाव्यात.
५. विषयांची/विद्याशाखांची/तुकडयांची किमान विद्यार्थीसंख्या शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार असावी.
६. संबंधित विषयाची/तुकडीची/विद्याशाखेची मान्यता शासकीय अनुदान तत्वावर दिली असेल तरच तात्पूरता कार्यभार मान्य समजण्यात येईल. अन्यथा त्यावरील खर्च अमान्य करण्यात येईल.
७. मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे विषय/तुकडी/विद्याशाखा यांना १०० टक्के अनुदान मान्य केलेल्या वर्षापासून अनुदानित पदे ग्राहय धरण्यात येतील.
८. शैक्षणिक वर्षात कार्यभारानुसार/मान्य निकषानुसार विद्यापीठ/संलग्नित महाविद्यालये यांच्या आस्थापनेवर मान्य होणारी व सरळसेवा भरतीने भरावयाची अतिरिक्त नवीन पदे शासननिर्णय

... २ ...

Scanned with CamScanner

वित्तविभाग क्रमांक - बीजीटी - १०९७/प्र.क्र.२४-अ/अर्थ-१९, दिनांक २.६.१९९८ व शासननिर्णय समक्रमांक दि.१५.१२.१९९८ मधील (परिच्छेद -९) नुसार शिक्षक संवर्गातील पदे तासिका तत्वावर भरावयाची आहेत.

९. शासन निर्णय क्र.एनजीसी-१२९८/(४६१९) युनि-४, दिनांक ११.१२.१९९९ मधील निर्देश/ अटी यापूढे लागू राहतील.

१०. शासन परिपत्रक दिनांक २८.१.२००० नुसार पद भर्तीसंबंधात कार्यवाही करावी.

११. खालील प्रमाणे पदे निश्चित करुन दिल्यानंतर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मागासवर्गीय कक्षामार्फत पदांचे आरक्षण निश्चित करुन घ्यावे. त्यानंतर पद भरण्याची कार्यवाही करण्यापूर्वी त्यास या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे. त्यानंतरच पदे भरण्याची प्रक्रीया करण्यात यावी.

१२. शासन निर्णय दिनांक १० सप्टेंबर २००१ अन्वये पूर्वीच्या मान्य पदांपेक्षा कार्यभार वाढल्यामुळे नवीन पदे निर्माण होत असल्यास सदरील पदांना (पदांच्या आढाव्यात) शासनाची मान्यता घेऊनच नियमानुसार पदे भरण्यासंबंधी कार्यवाही करावी. सदरची नवनिर्मित पदे शासन मान्यते शिवाय भरल्यास त्या पदांचा खर्च अनुदानास पात्र होणार नाही.

१३.शासन निर्णय संकीर्ण - १००२/(६९८/२००२)/आस्था-१, दिनांक ११ सप्टेंबर,२००३ व संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी-२००६/अपंगअनुशेष/मवि-१, दिनांक ३०/९/२००६ अन्वये अपंग अनुशेष भरणे आवश्यक राहील. अपंगांचा अनुशेष भरण्यासाठी कोणतीही बंदी नाही, व त्यासाठी पूर्वपरवानगी घेण्याचीही आवश्यकता नाही.

**दिनांक १.१०.२०१२ च्या विद्यार्थी संख्येच्या आधारे खालील प्रमाणे शिक्षक कर्मचा-यांची पदनिश्चिती करण्यात येत आहे.**

| अ. क्र. | विषय | एकूण कार्य भार | अनुज्ञेय पदे | संरक्षित पदे | भरलेली पदे | | रिक्त पदे | | पद रिक्त होण्याची कारणे | अतिरिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अधि. | प्राचार्य | अधिव्याख्याता पूर्णवेळ | अधिव्याख्याता तासिका तत्वावर | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | इंग्रजी | ५२ | ३ | -- | १ | -- | २ | -- | ०१ राजिनाम्या मुळे ०१ सेवानिवृत्ती मुळे | -- | ०१ विभागप्रमुख ०२ पूर्णवेळ |
| २ | अर्थशास्त्र व बँकींग | ५२ | ३ | -- | २ | -- | १ | - | कार्यभार वाढीमुळे | -- | ०१ विभागप्रमुख ०२ पूर्णवेळ |
| ३ | मराठी | ४० | २ | १ | ३ | -- | -- | -- | -- | -- | ०१ विभागप्रमुख ०१ पूर्णवेळ ०१ पूर्णवेळ संरक्षित |
| ४ | हिंदी | २० | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | ०१ पूर्णवेळ |
| ५ | राज्यशास्त्र | १६ | १ | -- | ० | १ | -- | १० तासिका | -- | -- | ०१ प्राचार्य तासिका तत्वावर |
| ६ | इतिहास | १६ | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | ०१ पूर्णवेळ |

... ३ ...

Scanned with CamScanner

| मागील पानावरुन | | | ११ | १ | ८ | १ | ३ | -- | -- | -- | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | भुगोल | १६ | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | ०१ पूर्णवेळ |
| ८ | संरक्षणशास्त्र | १६ | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | ०१ पूर्णवेळ |
| ९ | वाणिज्य | ७२ | ४ | -- | ३ | -- | ०१ | -- | न्यायप्रविष्ट | -- | ०१ विभाग प्रमुख<br>०३ पूर्णवेळ |
| १० | पदार्थविज्ञान | ४२ | २ | -- | १ | -- | १ | -- | कार्यभार वाढीमुळे | -- | ०१ विभाग प्रमुख<br>०१ पूर्णवेळ |
| ११ | रसायनशास्त्र | ८२ | ४ | -- | १ | -- | ३ | -- | कार्यभार वाढीमुळे | | ०१ विभागप्रमुख<br>०३ पूर्णवेळ |
| १२ | वनस्पतीशास्त्र | ३४ | २ | -- | १ | -- | १ | -- | कार्यभार वाढीमुळे | -- | ०१ विभाग प्रमुख<br>०१ पूर्णवेळ |
| १३ | प्राणीशास्त्र | ३४ | २ | -- | १ | -- | १ | -- | कार्यभार वाढीमुळे | -- | ०१ विभाग प्रमुख<br>०१ पूर्णवेळ |
| १४ | गणित | २१ | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | ०१ पुर्णवेळ |
| १५ | ग्रंथपाल | | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | ०१ पूर्णवेळ |
| १६ | शा.शि.संचालक | | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | ०१ पूर्णवेळ |
| | **एकूण** | | ३० | १ | २० | १ | १० | -- | -- | -- | --- |

(डॉ. अ.भ.साळी)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
जळगांव विभाग, जळगांव

प्रत माहितीस्तव रवाना
१. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा.पुणे-१
२. लेखाधिकारी, उच्च शिक्षण, जळगांव
३. कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

Recived on
26.09.2013.
Principal
Arts, Commer & Science College
Dharangaon Dist. Jalgaon

Arts, Commerce & Science College,
DHARANGAON, Dist. Jalgaon.
Inward No. 362
Date 26-9-2013